भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र.२००/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ३०/०४/२०१७

**१) जिल्हा सर्वेक्षण मृद चाचणी कार्यालयातील संगणक कक्षाचे खिडकीचे पट उघडुन संगणक साहीत्य चोरी केल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक २७/०४/२०१७ चे १८.०० ते दि. २९/०४/२०१७ चे ०९.३० वा. दरम्यान यातील फिर्यादीने दि. २७/०४/२०१७ चे १८.०० वा. आपले कार्यालय बंद करून व दि.२९/०४/२०१७ चे ०९.०० कार्यालयात आले असता कार्यालयातील संगनक कक्षात संगणक दिसुन आला नाही. कोणीतरी अज्ञात चोराने संगणक कक्षाचे खिडकीचे पट उघडुन आत प्रवेश आत करून एच सी एल कंपनीचा एक मॉनीटर, १किबोर्ड, १ माऊस असा एकुन ५,३००/रू. चा माल चोरून नेल्याने फिर्यादी मिलींद वंसत गुहेकारे वय ५४ वर्ष रा. हिदुस्तान कॉलनी हिमालय व्हॅली अपार्टमेंट नागपुर,जिल्हा सर्वेक्षण मृद चाचणी अधिकारी भंडारा यांचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ४५४,४५७,३८०,३४ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. गायकवाड पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहे.

**२) शेताचे विहीरीवर लावलेली मोटार चोरी केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक २८/०४/२०१७ चे १२.०० ते २९/०४/२०१७ चे ०८.०० वा. दरम्यान यातील यातील तोडीराम भोंगाडे यांचे शेतात विहीरीवर लावलेली १ सीआरआय कंपनीची १.५ हार्स पॉवरची मोटार किं. ६०००/रू.ची कोणीतरी अज्ञात चोराने सुनामौका पाहुन खुल्या जागेतुन चोरून नेल्याने फिर्यादी चंद्रकला सदाशिव मदनकर वय ४२ वर्ष रा. शिवाजी नगर तुमसर यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ३७९ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. कळंबे पो.स्टे. तुमसर हे करीत आहेत.

**३) संगनमत क्षुल्लक कारणावरून भांडन शिवीगाळ,ढकलढुकल, काठीने मारून जखमी करून धमकी दिल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक २९/०४/२०१७ चे १२.३० वा दरम्यान यातील आरोपीतांनी फिर्यादीचे शेतात अनाधिकृतपणे प्रवेश करून तीच्या शेतातील जेसीपी मशिन ने माती टाकुन रस्ता तयार करण्याचे कारणावरून आरोपीतांनी संगनमत करून फिर्यादीचे पती दोन मुलांसोबत भांडन व शिवीगाळ व ढकलढुकल करून आरोपी क्र.२ ने फिर्यादीचे दोन्ही हाताचे मनगटावर काठीने मारल्याने बांगळया फुटुन जखमी करून मारण्यापिटण्याची धमकी दिल्याने फिर्यादी सौ. शामकला गणराज कुथे वय ४८ वर्ष रा. सालई यांचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ४४७,३२४,५०४,५०६,३४ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. माहुर्ले पो. स्टे. तुमसर हे करीत आहे.

**४) काळी पिवळी चालकाच्या निष्काळजीपणामुळे मो.सा.ला ओव्हरटेक करून धडक मारून जखमी पळुन गेल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक २९/०४/२०१७ चे ०७.१५ वा दरम्यान यातील जखमी सुनील शिवराम ईलमकर वय ४२ वर्ष रा उकारा हा आपले मोटार सायकल स्प्लेंडर क्र एम एच ३६/डी १४०४ नी सेंदुरवाफा कडुन साकोली मार्गे एनएच ०६ रोडने येत सतांना यातील अनोळखी आरोपी वाहन चालकाने आपले ताब्यातील काळी पिवळी वाहन भरधाव वेगाने, हयगयीने, निष्काळजीपणे चालवुन जखमीचे मोसा ला ओव्हटेक करुन अचानक जखमीचे मोसा पुढे उभे करुन धडक मारुन जखमी केल्याने अपघाताची माहीती न देता पळुन गेलयाने फिर्यादी यशवंत वासुदेव मोटघरे वय ४० वर्ष रा उकारा यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम २७९,३३७ भांदवि. सहकलम १३४,१७७ मोवाका. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मेश्राम पो. स्टे. साकोली हे करीत आहे.

**५) संगनमत करुन लग्नातील सुलग्न ओवाळणीचे लिफाफे व चांदीच्या साहीत्याची थैली चोरी केल्याने गुन्हा नोंद . :-**

दिनांक २८/०४/२०१७ चे २३.४५ वा. दरम्यान यातील फिर्यादीचे लहान भावाचे सोसायटी हायस्कुल साकोली येथे लग्न कार्य सुरु असतांनी दोन अनोळखी आरोपीतांनी सुलग्न लावतांनी नवरदेवाजवळ जमा झालेले ओवाळणीचे लिफाफे व चांदीच्या साहीत्याची थैली चोरी करुन घेवुन पळाले तेव्हा फिर्यादी हा त्यांचे पाठीमागे धावले असता माल घेवुन पळुन गेले असे फिर्यादी मुन्हालाल मोतीलाल गुप्ता वय ४५ वर्ष रा तिमाजी कॉलनी साकोली यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ३७९,३४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. बागडे पो.स्टे. साकोली हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**६) घराच्या दरवाज्याची साखडी काढून रुममध्ये ठेवलेली लाखडी आलमारी बांधीत नेवुन ताला तोडुन त्यामधील ठेवलेले सोन्याचे दागीने व पैश्याची चोरी केल्याने गुन्हा नोंद :-**

दिनांक २८/०४/२०१७ चे २३.३० ते दि. २९/०४/२०१७ चे ०१.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी ही पती मुलांसह घराचे समोरील छपरीत झोपली असता लहान मुलाला ताहान लागली असता मुलाला पाणी देण्या करीता उठली असता घरातील आलमारी दिसुन आली नाही म्हणुन पतीला सांगुन आलमारीचा शोध घेतला असता यातील अज्ञात आरोपीने घराचे मागील दरवाज्याची साखडी काढुन आत प्रवेश करुन घराचे मधल्या रुममध्ये ठेवलेली लाखडी आलमारी उचलुन नेवुन बांधीत ठेवली व तिचा ताला तोडुन त्यामध्ये ठेवलेले ३ ग्राम सोण्याची मोरपंखी नथ , ३ ग्राम बदाम छाप अंगठी , ४ ग्राम सोन्याचे डोरले मनी, चांदीच्या तोरडया व नगदी ५०००/रु असा एकुण २५,५००/रु चा माल चोरून नेल्याने फिर्यादी सौ रजनी राजु लांजेवार वय ३० वर्ष रा उमरी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ४५७,३८०भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा भजने पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहे.

**७) ट्रक चालकाच्या निष्काळजीपनामुळे दोन वेगवेगळया ठिकाणी मोटार सायकलला धडक मारुन दोन ईसम जखमी करण्यास कारर्णीभुत झाल्याने गुन्हा नोंद :-**

दिनांक २९/०४/२०१७ चे १२.१५ वा. दरम्यान यातील फिर्याद ने आपली हिरो होन्हा सीडी डिल्क्स मोटार सायकल क्र एम एच ३५ क्यु ४६१६ ही डामरी रोडच्या बाजुला उभी कडुन ठेवली असता यातील आरोपी चालकाने आपले ताब्यातील ट्रक भरधाव वेगाने व लापरवाहीने चालवुन फिर्यादीचे मोसाला धडक मारुन पळुन जावुन पुढे सानगडी गुजरी चौकात विरुध्द दिशेने येणाऱ्या मो सा क्र एम एच ३५ वाय २६२५ ला धडक मारुन चालक प्रशांत गोपाल वैदय वय २६ वर्ष व त्याची वहीन कु. ज्योती वैदय वय २४ वर्ष दोन्ही रा बोरटोला यांना जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादी रामेश्वर सुखलु लोंबडे वय ३६ वर्ष रा ऐकोडी यांचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम २७९,३३७ भांदवि. सह कलम १८४ मोवाका अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा मेश्राम पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहे.


(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र.९९८७३८५४०५


प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.